## निशाणी ५ व नि.क्र.२४ वरील संयुक्त आदेश

वादीने नि. क्र.५ प्रमाणे व मुळ प्रतिवादी यांनी नि.क्र.२४ प्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रस्तुतचे अर्ज दाखल केले आहेत.

२. **वादीचे थोडक्यात कथन असे आहे की,**

"मौजे दगडथर ता. महागांव जि. यवतमाळ येथील शेत भुमापन क्र. १६ क्षेत्रफळ ३ हे. ४९ आर भोगवटदार वर्ग २ चे शेत याच्या चतुः सिमा पूर्वेस–शेत भुमापन क्रं. ५७, पश्चिमेस–शेत भुमापन क्रं.१३ राजु किसन पवार यांचे शेत व शेत भुमापन क्रं. १४ जयराम मदन राठोड यांचे शेत, उत्तरेस–शेत भुमापन क्रं. १७ भिमराव मोतीराम शेळके व इतर याचे शेत आणि दक्षिणेस–शेत भुमापन क्रं. १५ कोंडबा दादाराव कऱ्हाळे यांचे शेत या चतुः सिमेतील ३ हे. ६४ आर जमीन जलतरुपाषाणासह पुर्ण." पुढे या अर्जात या शेतजमीनीस "वाद शेत जमीन मिळकत" असे संबोधण्यात येईल.

३. वादीचे पुढे असेही कथन आहे की, वाद शेतजमीन वादी क्रं. १ ते ४ यांचे आजोबा तथा वादी क्रं. ५ चे सासरे मुन्ना टोपा बंजारी यांना शासनाकडून वि. उपविभागीय पदाधिकारी साहेब पुसद यांचे फायलावरील रा.मा.क्रं.२०/६०ए/(६)/६५–६६ नुसार वहिती करुन त्यातील उत्पन्न खाण्यासाठी देण्यात आली. त्यानुसार त्याचे नावाने महसुल रेकॉर्डला दिनांक ०९/०८/१९७२ रोजी फेरफार क्रं.१९५ प्रमाणे नोंद रुजु करण्यात आली. अशाप्रकारे मुन्ना टोपा बंजारी हे वाद शेतजमीनीचे भुमीधारी हक्काने मालक व कब्जेदार झाले व तेंव्हापासुन वाद शेतजमीनी स्वतः अंगमेहनतीने वहिती करुन उत्पन्न घेत आले.

४. वादीचे पुढे असेही कथन आहे की, त्यानंतर वादी क्रं.१ ते ४ यांचे आजोबा तथा वादी क्रं.५ चे सासरे मुन्ना टोपा बंजारी (जाधव) हे दिनांक १६/०५/२००९ रोजी मृत्यु पावले. त्यामुळे वादी क्रं.१ ते ४ यांचे वडील तथा वादी क्रं.५ चे पती दत्ता मुन्ना जाधव हे वारसाहक्काने वाद शेतजमीनीचे भुमीधारी हक्काने मालक व ताबेदार झाले. त्यानंतर दत्ता मुन्ना जाधव हे दिनांक २३/०८/२०२० रोजी मृत्यु पावले. त्यामुळे वादी क्रं.१ ते ५ हे वारसाहक्काने वाद शेतजमीनीचे भुमिधारी हक्काने मालक व कब्जेदार झाले असुन, तसा वाद शेतजमीनीच्या अधिकार अभिलेखात महसुल रेकॉर्डला वादी क्रं.१ ते ५ यांचे नावाचा वारसा फेरफार क्रं.१३२५ हा दि.०९/१२/२०२० रोजी रुजु करण्यात आला आहे.

५. वादीचे पुढे असेही कथन आहे की, अशाप्रकारे वाद शेतजमीन भुमिधारी हक्काने वादींचेच मालकी, ताबा, वापर, वहिती व उपभोगात आहे. असे असतांना प्रतिवादी हे पाडवा सनाच्या २०२१ पासुन वादींचे वाद शेतजमीनीचे ताबा, वापर, वहिती व उपभोगास अडथळा निर्माण करुन वादींना वाद शेतजमीनीची वहिती करण्यास त्रास देत आहेत, शेतजमीनीतील पिकास नुकसान पोहचवित आहेत. प्रतिवादी हे कधीही वाद शेतात आले नाही व वाद शेताची प्रतिवादींनी कधीही वहिती केली नाही व शेतजमीनीचे ताबा, वापर, वहिती व उपभोगाशी प्रतिवादीचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी हे वाद शेतजमीन जोरजबरदस्तीने ताब्यात घेवुन हडप करण्याच्या वाईट इराद्याने वादींना वाद शेतजमीनीचे ताबा, वापर, वहिती व उपभोगास अडथळा निर्माण करुन वाद शेतजमीनीतील पिकामध्ये गुरेढोरे सोडुन नुकसान करीत आहेत. वादींनी प्रतिवादी यांना समजावुन सांगन्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादींनी वाद शेतजमीन आमची आहे, पुन्हा वाद शेतात यायचे नाही, नाहीतर एकेकाचा खुन करीन अशी

धमकी दिली. वादी यांनी प्रतिवादींना प्रतिष्ठित पंचामार्फत समजावुन सांगन्याचा प्रयत्न केला परंतु प्रतिवादी हे कोणाचेही ऐकण्यास तयार नाहीत.

६. वादीचे पुढे असेही कथन आहे की, वादी हे दिनांक १३/०३/२०२२ रोजी वाद शेतातील साफसफाई करीत असतांना प्रतिवादी हे वाद शेतात बेकायदेशिररीत्या आलेत व प्रतिवादींनी वादीस शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वादी क्रं.१ याने सदर घटनेची फिर्याद पोलीस स्टेशन महागांव यांचेकडे दि.१४/०३/२०२२ रोजी दिली. प्रतिवादी यांनी जोरजबरदस्ती करून वाद शेतावर ताबा केल्यास वादीचे अपरिमीत व कधीही भरून न निघणारे नुकसान होईल त्यामुळे वाद शेताचे वादीचे ताबा, वापर, वहिती व उपभोगास प्रतिवादींनी स्वतः अगर इतर कोणाही मार्फत कधीही अडथळा करू नये असा कायम स्वरुपाचा मनाई हुकूम मिळणे न्याय व जरुरी आहे. त्यामुळे वादीस सदरचा दावा आणावा लागला आहे.

७. वादीचे पुढे असेही कथन आहे की, वादीने दाखल केलेल्या मुळ दाव्याचा अंतिम निर्णय होण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. वादीच्या दाव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन केल्यास वादींचे बाजुने सकृदर्शनी प्रथमदर्शनी केस असून, सुविधतेची तौलनिक बाजु देखील वादीच्या बाजुने आहे तसेच प्रतिवादीने वाद शेतावर ताबा केल्यास वादीचे अपरिमित व कधीही भरून न निघणारे नुकसान होईल त्यामूळे दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी यांनी स्वतः अगर इतर कोणाही मार्फत वहिती व उपभोगास अडथळा निर्माण करु नये तसेच पिकास नुकसान पोहचवु नये असा दाव्याचा अंतिम निकाल लागे पावेतो प्रतिवादी विरुध्द एकतर्फी तात्पुरता मनाई हुकूम मिळणे आवश्यक आहे.

८. प्रतिवादींनी हजर होवून त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.२१ वर दाखल केला. सदरचा लेखी जवाब निशाणी क्र.५ च्या तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जास लेखी उत्तर समजण्यात यावी अशी नि.क्र.२३ नुसार पुरसिस दाखल केली. तसेच प्रतिवादींनी नि.क्र.२२ कडे प्रतिदावा दाखल केला आहे. व नि.क्र.२४ कडे तूर्तातूर्त मनाई अर्ज दाखल केला आहे.

९. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादी यांचा वाद मालमत्तेच्या प्रत्यक्ष ताब्याशी काहीही संबंध नाही. वादी अथवा वादीचे पूर्वज हे कधीही मौजा दगडथर येथे राहावयास आलेले नसल्यामूळे त्यांचा वाद मालमत्तेचे ताब्याशी प्रत्यक्ष कोणताही संबंध आलेला नाही. वादी हे वाद मालमत्तेचे मालक व कब्जेदार होवुन वाद शेताची वहिती करून उत्पन्न घेतात हे म्हणणे धादांत खोटे असल्याचे कथन केले आहे. वादीचे पुर्वज मयत मुन्ना यांचे कुटूंब भूमिहीन होते आणि मयत मुन्ना हे सुतारकाम करीत होते. सन १९९६ मध्ये मुन्ना यांनी वादातील मालमत्ता विक्री काढली त्यावरुन प्रतिवादी क्रं.२ ची आई मयत पारीबाई परशराम राठोड हिने वाद शेत मक्ता बटाईने तिचेच वहितीत असल्याने मयत मुन्ना टोपा बंजारी यांचे सोबत वाद शेताचे विक्री बाबत सौदा करुन वाद शेत दि.०७/०६/१९९६ रोजी रक्कम रु.४००००/– च्या मोबदल्यात विक्रीचा सौदा करुन इसारा दाखल रु.३०,०००/– मयत मुन्ना टोपा यास नगदी देवुन वाद शेतजमीनीचा स्वतंत्र ताबा घेतला व उर्वरीत रक्कम रु.१०,०००/– दि.२९/११/१९९६ रोजी देवुन सक्षम प्राधिकाऱ्याचे परवानगी नंतर खरेदीखत करुन देण्याचे मान्य केले. परंतु रक्कम रू.१०,०००/– स्विकारुन खरेदीखताची अट कायम ठेवुन वादातील शेत ९९ वर्षाकरीता म्हणजेच सन १९९७–९८ पासुन सन २०९६–९७ या कृषी वर्षा करीता दि.३१/०३/२०९७ पर्यंत खंडपट्ट्याने एकुण रक्कम रु.४०,०००/– च्या मोबदल्यात खंडपट्ट्याने दिली. त्यानंतर अद्याप पावेतो वादी क्रं.१ ते ५ हे

सुध्दा कधीही दगडथर येथे आलेले नाहीत आणि वाद शेताची वहिती केलेली नाही. केवळ महसुल दप्तरी मालकी हक्का बाबत फेरफार झालेले असल्याने वादींनी सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे.

१०. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादी यांचा वाद शेताचे ताब्याशी कोणताही संबंध नाही. वादातील मालमत्ता ही वादीचे पुर्वज मुन्ना टोपा बंजारी यांनी सन १९९६ मध्येच प्रतिवादी क्रं.२ चे आईस हस्तांतरीत केलेली असल्यामूळे वादी यांचा वाद मालमत्तेशी प्रत्यक्ष कोणताही संबंध राहीलेला नाही. वादीने खोटा व बनावट असा दावा वि. न्यायालयात दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी वादीची वाद मिळकती वरील कब्जा व मालकी नाकारलेली आहे. त्या मिळकतीवर प्रतिवादींचा कब्जा आहे असे कथन केले आहे. त्यामुळे वादीचा मनाई अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

११. प्रतिदाव्यातील तूर्तातूर्त मनाई अर्जामधील आवेदक/मुळ प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे–

१२. मौजा दगडथर ता. महागांव जि. यवतमाळ येथील शेत भुमापण क्र. १६, क्षेत्रफळ ३ हे. ६४ आर,याच्या चतु:सिमा पुर्वेस–सरकारी जंगल, पश्चिमेस जयराम मदन राठोड व राजुसिंग भिसु पवार यांचे शेत, उत्तरेस– भिमराव मोतीराम शेळके व इतर यांचे शेत आणि दक्षिणेस– बळीराम ढाकु राठोड यांचे शेत आहे. वादातील मालमत्ता ही मुळात प्रतिवादीचे पुर्वज मुन्ना टोपा बंजारी यांना शासनाकडून सक्षम प्राधिकरण यांचे पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण न करण्याच्या अटीवर मिळाली होती. परंतु मयत मुन्ना टोपा बंजारी हे त्यांचे पुर्वजापासून शेती व्यवसाय नसल्याने आणि वाडवडिलांपासूनच शेतजमीनी करीता आवश्यक

असलेले लाकडी अवजारे बनविण्याचा व्यवसाय कुटूंबात प्रचलित असल्याने मयत मुन्ना टोपा बंजारी हे मुळचे मौजा इसापुर टाकळी, ता. उमरखेड येथील कायम रहिवासी होते व त्यांचे कुटूंबात शेती कामे न करता शेतीकरीता लागणारी लाकडी अवजारे बनविण्याचे म्हणजेच सुतार काम करीत असत.

१३. आवेदक/मुळ प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, मयत मुन्ना टोपा बंजारी यांना वाद मालमत्ता मिळाल्यानंतर प्रथम काही दिवस वादातील मालमत्ता मक्ता बटाईने लावून देत होते. शेवटी मुन्ना टोपा बंजारी यांनी सन १९९६ मध्ये वादातील मालमत्ता विक्री काढली. त्यावरुन वादी क्र. २ ची आई मयत पारीबाई परशराम राठोड हिने वाद शेत मक्ता बटाईने तिचेच वहितीत असल्याने मयत मुन्ना टोपा बंजारी यांचे सोबत वाद शेताचे विक्री बाबत सौदा करुन वाद शेत दिनांक ०७/०६/१९९६ रोजी रक्कम रु.४०,०००/– च्या मोबदल्यात विक्रीचा सौदा करुन इसारा दाखल रु.३०,०००/– मयत मुन्ना टोपा यास नगदी देवून वाद शेतजमीनीचा स्वतंत्र ताबा घेतला व उर्वरित रक्कम रु. १०,०००/– दि.२९/११/१९९६ रोजी देवून सक्षम प्राधिकाऱ्याचे परवानगी नंतर खरेदीखत करुन देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे मयत मुन्ना टोपा बंजारी यांनी दि.०७/०६/१९९६ रोजी रु.५/– चे दोन स्टॅम्प पेपर विकत घेवून त्यावर साक्षदारासमक्ष सौदाचिठ्ठीचा लेख लिहून दिला. परंतु परवानगी मिळण्यास विलंब होत असल्याने उर्वरित रक्कमेची मागणी करुन वादातील मालमत्ता खरेदीखताची अट कायम ठेवून ९९ वर्षाचे कालावधी करीता खंडपट्ट्याने देण्याचे साक्षदारांसमक्ष मान्य केले.

१४. आवेदक/मुळ प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, त्याप्रमाणे दि.०६/०५/१९९७ रोजी सौद्याप्रमाणे उरलेली रक्कम रु.१०,०००/– स्विकारुन खरेदीखताची अट कायम ठेवून वादातील शेत ९९ वर्षाकरीता म्हणजेच

सन १९९७–९८ पासून सन २०९६–९७ या कृषी वर्षा करीता दि. ३१/०३/२०९७ पर्यंत खंडपट्याने एकूण रक्कम रु.४०,०००/– च्या मोबदल्यात दिली. त्याप्रमाणे दि.०६/०५/१९९७ रोजी रु.१००/– चा स्टॅम्प पेपर घेवून साक्षदारासमक्ष खंडपट्टयाचे लेख लिहून दिला. मुन्ना टोपा व त्यांचा मुलगा दत्ता यांचे मृत्युनंतर अद्यापपावेतो प्रतिवादींनी कधीही अडथळा केला नाही. प्रतिवादी हे वाद मालमत्तेमध्ये अथवा मौजा दगडथर येथे प्रत्यक्ष आलेले नाहीत. प्रतिवादींनी वादी विरुध्द दावा दाखल केल्यामुळे वादी यांना वाद मालमत्तेचे संरक्षणाकरीता व त्यांचे हक्क व अधिकाराचे संरक्षणा करीता आणि प्रतिवादींचे पुर्वज मुन्ना टोपा बंजारी यांनी करुन दिलेल्या दस्तऐवजाचे आधारे कायदेशीर मागणी करण्याकरीता सदरचा प्रतिदावा दाखल करावा लागला आहे. वादातील मालमत्ता अर्जदार/प्रतिदाव्यातील वादीचाच ताबा, वापर, उपभोगात असल्याने अर्जदार/प्रतिदाव्यातील वादी यांना सदरचा अर्ज करावा लागत आहे. अर्जदार/प्रतिदाव्यातील वादी यांना तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास गैरर्जदार/प्रतिदाव्यातील प्रतिवादी हे अर्जदारांना वाद मालमत्तेतून बेदखल करुन जोरजबरदस्तीने ताबा घेण्याची शक्यता आहे असे झाल्यास अर्जदार यांचे अपरिमित असे पैशाच्या स्वरुपात भरुन न निघणारे नुकसान होणार आहे. या उलट गैरअर्जदारांचे काहीही नुकसान होणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार/प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी अर्जदार/वादींचे ताबा, वहिती, वापर, उपभोगातील वाद मालमत्तेस स्वतः अथवा इतरांमार्फत कोणत्याही प्रकारे अडथळा करु नये असा तात्पुरत्या स्वरुपाचा मनाई हुकूम देण्याची कृपा करावी अशी विनंती केली आहे.

१५. प्रतिवादीं/मुळ वादी यांनी हजर होवून प्रतिदाव्यास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.३० वर दाखल केले. सदरचा लेखी जवाब निशाणी क्र.२४ च्या प्रतिदाव्यातील तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जास लेखी उत्तर समजण्यात यावी अशी नि.क्र.३१ नुसार पुरसिस दाखल केली.

१६. अनावेदक/मुळ वादी याने आवेदक/मुळ प्रतिवादींच्या प्रति दाव्यातील व तूर्तातूर्त मनाई अर्जातील कथने नाकारलेली आहेत. उरलेला मजकुर हा अर्जदारच्या नि.क्र. ५ कडील अर्जामध्ये नमुद केल्या प्रमाणे आहे. तो वर नमुद केलेला असल्यामुळे पुणरावृत्ती टाळण्या करीता येथे घेण्यात आलेला नाही. मुळ वादींचे कथन आहे की, प्रतिदाव्यातील तूर्तातूर्त मनाई अर्जातील मजकूर खोटा आहे त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

१७. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथना वरुन माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात व त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | मुळ वादींनी त्याचे म्हणने सकृत दर्शनी बरोबर असल्याचे सिद्ध केले आहे काय? | .. **होकारार्थी.** |
| २ | न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने असल्याचे वादींनी सिद्ध केले आहे काय? | .. **होकारार्थी** |
| ३ | वादींचे मागणीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादींचे नुकसान होणार आहे काय? | .. **होकारार्थी** |
| ४ | यातील आवेदक/मुळ प्रतिवादींनी त्यांचे म्हणने सकृत दर्शनी बरोबर असल्याचे सिद्ध केले आहे काय? | .. **नकारार्थी** |
| ५ | न्यायाचा समतोल त्याचे बाजूने असल्याचे आवेदक/मुळ प्रतिवादींनी सिद्ध केले आहे काय? | .. **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ६ | मागणीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास आवेदक/मुळ प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय? | .. **नकारार्थी** |
| ७. | आदेश कोणता ? | .. **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## :: <u>कारणमीमांसा</u> ::

१८. वादींनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

१. सर्वे क्र.१६ चा सातबाराची प्रमाणित प्रत.

२ सर्वे क्र.१६ चा गाव नमुना–८–अ ची प्रमाणित प्रत.

३. सर्वे क्र.१६ चा फेरफाराची प्रमाणित प्रत.

४. पेरेपत्रक सन १९७७–७८ ची प्रमाणित प्रत.

५. पेरेपत्रक सन १९७५–७६ ची प्रमाणित प्रत.

६. पेरेपत्रक सन १९७९–८० ची प्रमाणित प्रत.

७ उपविभागीय अधिकारी पुसद यांचे आदेश ची प्रमाणित प्रत.

८. हक्क नोंदणी रजिस्टरची प्रमाणीत प्रत.

९. मुन्ना टोपा बंजारी यांचे मृत्यु प्रमाणपत्राची अस्सल प्रत.

१०. दत्ता मुन्ना जाधव यांचे मृत्यु प्रमाणपत्राची अस्सल प्रत.

११. मौजा दगडथर येथील गट क्र.१६ ची नकाशाची प्रमाणित प्रत.

१२. मौजा दगडथर येथील गट क्र.१६ च्या चतु:सिमा ची प्रमाणित प्रत.

१३. पो. स्टे. महागांव येथे दिलेल्या एफ. आय. आर. ची प्रत.

१४. बियाने बिलची दुय्यम प्रत.

१५. वादी क्र. १ चे बँकचे पास बुक ची प्रमाणीत प्रत.

१६. किसन मोतीराम शेळके यांचे प्रतिज्ञापत्र.

१७. अशोक रन्ना राठोड यांचे प्रतिज्ञापत्र.

१८. संजय श्रावण मुडे यांचे प्रतिज्ञापत्र.

१९. नागोराव पुंजाराम ढोले यांचे प्रतिज्ञापत्र.

२०. देविदास तुकाराम बुरकुले यांचे प्रतिज्ञापत्र.

२१ किसन जेमला जाधव यांचे प्रतिज्ञापत्र.

१९. प्रतिवादी यांनी त्याचे कथनाच्या पुष्ट्यर्थ खालील कागदपत्रे दाखल केलेली आहे.

१ सौदेचिट्ठीची झेरॉक्स प्रत.

२. खंडपट्टयाची झेरॉक्स प्रत.

३. तलाठी दगडथर यांचा अहवाल व पंचनाम्याची झेरॉक्स प्रत.

४. तहसीलदार, महागांव यांचे पत्राची झेरॉक्स प्रत.

५. बळीराम ढाकु राठोड यांचे प्रतिज्ञापत्र.

६. राजु किसन पवार यांचे प्रतिज्ञापत्र.

७. कैलास कनिराम जाधव यांचे प्रतिज्ञापत्र.

८. सुरेश गोबरा आडे यांचे प्रतिज्ञापत्र.

२०. वादींतर्फे **श्री एस. आर. राउत, वकील** व प्रतिवादींतर्फे **श्री एस. बी. नाईक, वकील** यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ६ करीता–</u>**

२१. मुळ दाव्यातील वादीचे असे कथन आहे की, ते वाद शेत जमिनीचे मालक व ताबेदार आहेत व आज रोजी देखील त्या मिळकतीवर वादींचा कब्जा आहे. सन २०२१ साली पाडव्या सना वेळी प्रतिवादींनी वादीच्या कब्जास हरकत अडथळा केला. त्यानंतर प्रतिवादींनी त्यांच्या कब्जास दि.१३/०३/२०२२ व दि.१४/०३/२०२२ रोजी व त्या नंतर हरकत अडथळा करु लागले आहेत. प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादी यांचे असे कथन आहे की, ते वाद शेत जमिनीचे मालक व कब्जेदार आहेत. त्यामुळे तूर्तातूर्त मनाई अर्ज निकाली काढतांना अभिलेखावरील उपलब्ध कागदोपत्री पुराव्या वरुन वाद शेत जमीन मिळकतीवर सकृत दर्शनी कोणाचा कब्जा आहे हे पाहणे आवश्यक आहे. मुळ दाव्या सोबत नि.क्र.३ लगत वादीने वाद शेत जमीन मिळकतीचे सातबारा उतारा, गाव नमुना आठ–अ उतारा, फेरफार उतारा, परेपत्रक आणि गट क्र.१६ चा हक्क नोंदणी रजिस्टरचा उतारा, मौजे दगडथर येथील गट क्र.१६ चा नकाशा व वाद शेत मिळकतीचा चतु:सिमा दर्शविणारा तलाठी यांनी निर्गमीत केलेला नकाशा व ईतर कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा शेत जमीन मिळकत ही वादी क्र.१ ते ४ यांचे आजोबा व वादी क्र.५ यांचे सासरे मुन्ना टोपा बंजारी यांना शासना कडून वहिती करुन उत्पन्न घेण्या करीता देण्यात आली व तसा दस्त फेरफार क्र.१९५ दि.०९/०८/१९७२ राजी मंजूर झाला. तसेच मुन्ना टोपा बंजारी यांच्या हयाती नंतर ती मिळकत त्यांचा मुलगा दत्ता मुन्ना जाधव याच्या नावे महसुल अभिलेख

पत्रकी नोंद झाल्याचे दिसुन येते. दत्ता मुना जाधव हे दि.२३/०८/२०२० रोजी मयत झाल्याचे त्याच्या मृत्यु प्रमाणपत्रावरुन दिसून येते. त्यानंतर फेरफार क्र.१३२५ नुसार वादींच्या नावाची नोंद वाद शेत मिळकतीच्या सातबारा व गाव नमुना ८–अ वर महसुल अभिलेख पत्रकी मालक व कब्जेदार म्हणुन नोंद झाल्याचे दिसून येते. तसेच पेरेपत्रकाचे अवलोकन केले असता मुन्ना टोपा बंजारी हे त्याचे हयातीमध्ये स्वत: वाद शेत जमीन मिळकतीचे वहिती करीत होत व त्यातून ज्वारी, मुग इत्यादी पिके घेत असे दिसून येते. सदरचे पेरेपत्रक हे १९७९/८० सालचे आहे तर तीच मिळकत मुन्ना टोपा बंजारी यांनी सन १९७७/७८ साली बटाईने दिली होती असेही दिसून येते.

२२. प्रतिवादिंनी/प्रतिदाव्यातील वादींनी प्रतिदाव्यातील वादशेत जमिनीवर त्याचा मालकी व कब्जा आहे हे दर्शविण्यासाठी नि.क्र.२६ लगत कागदोपत्री पुरावा म्हणून स्थावर मिळकतीच्या सौदेचिठ्ठीची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता स्थावर मिळकतीची सौदेचिठ्ठी ही ५ रुपयाच्या दोन स्टॅम्प पेपरवर करुन घेतले आहे व त्यावर मुळ दाव्यातील वादी क्र.१ व ४ यांचे आजोबा मुन्ना टोपा जाधव यांनी मौजा दगडथर येथील गट क्र.१६ मधील ३ हे.६४ आर ही मिळकत रक्कम रु.४०,०००/– च्या मोबदल्यात प्रतिवादाव्यातील वादी क्र.२ यांची आई पारिबाई हिला लिहून दिल्याचे दिसुन येते. सदरची सौदेचिठ्ठी दि.०७/०६/१९९६ रोजीचे आहे. त्यानंतर दि.०६/०५/१९९७ रोजी मुन्ना टोपा बंजारी यांनी दावा शेत मिळकत सोदेचिठ्ठी प्रमाणे ठरलेली रक्कम रु.४०,०००/– पैकी पूर्वी भेटलेले रक्कम रू.३०,०००/– व राहिलेली रक्कम रू.१०,०००/– घेउन दावा मिळकत प्रतिदाव्यातील वादी क्र.२ ची आई पारीबाई परसराम राठोड हिला ९९ वर्ष येवढ्या खंड पट्ट्याने ताब्यात दिल्याचे त्यामध्ये नमूद आहे. परंमु मौजे दगडथर येथील गट क्र.१६ मधील वाद शेत मिळकत वादी क्र.१ ते ४ यांचे आजोबा व

वादी क्र.५ चे सासरे मुन्ना टोपा बंजारी यांना ती शासना कडून वहिती करण्यासाठी मिळालेली आहे. असे प्रतिवादींनीच त्यांच्या कैफियतीमध्ये व प्रतिदाव्यात मान्य केलेले आहे. त्यामुळे ती शेत जमीन मुन्ना बंजारी यांना शासना कडून मिळालेली आहे हे शाबीत होते. परिनामी वाद शेतजमीन ही मन्ना बंजारी यांना शासनाकडुन मिळेलेली असल्यामुळे ती जमीन हस्तांतरीत करण्या करीता योग्य त्या शासकीय अधिकाऱ्याची परवानगी घेने आवश्यक आहे. परवानगी न घेता ती मिळकत ईतरांना हस्तांतरीर करता येत नाही. असे असतांनाही प्रतिदाव्यातील वादी क्र.२ ची आई पारीबाई यांनी त्या मिळकती बद्दल मुन्ना टोपा बंजारी यांचे कडून सौदा चिठ्ठी व खंडपट्टा करुन घेतल्याचे दिसून येते. व ते दोन्ही दस्त हे नोंदणीकृत नाहीत तसेच त्या व्यवहारास योग्य त्या शासकीय अधिकाऱ्याची परवागनी घेतल्याचे नमूद नाही. प्रचलित कायद्याचे तरतुदी नुसार सदरचे दस्त नोंदणीकृत असणे कायद्याने अपेक्षीत आहेत. त्यामुळे ते दस्त तूर्तातूर्त मनाई अर्ज निकाली करीत असतांना ग्राह्य धरणे योग्य नाही. तसेच प्रतिदाव्यातील वादीने नि.क्र.२६ कडे तलाठी दगडथर यांचा अहवाल व पंचनाम्याच्या नक्कलेची प्रत आणि तहसीलदार, महागांव यांचे पत्र याची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. परंतु सदर दोन्ही दस्तातील मजकूर हा पुराव्या अंती शाबीत झाल्याखेरीज याक्षणी ग्राह्य धरणे अपेक्षीत होणार नाही.

२३. प्रतिवादी/प्रतिदाव्यातील वादीने बळीराम राठोड, राजु पवार, कैलास जाधव, सुरेश आडे ईत्यादी लोकांचे शपथपत्रे दाखल केली आहेत. परंतु त्या शपथपत्रतील मजकुर हा शपथपत्र दाखल करणाऱ्या व्यक्तीच्या साक्षी पुराव्या अंती शाबीत झाल्या शिवाय त्यातील मजकूर ग्राह्य धरणे योग्य नाही. वादींनी दाखल केलेले वाद शेत जमीन मिळकतीचे सातबारा उतारा व गाव नमूना ८–अ उतारा व फेरफार उतारा हे मालकी हक्क दाखविणारा ठोस पुरावा नाही. परंतु वाद शेत जमिनीच्या मालकी हक्का बाबत ठोस व भक्कम पुरावा अभिलेखावर

नसल्यामुळे व तसा दस्तऐवज पटलावर नसल्यामुळे वाद शेतजमीन मिळकतीचे सातबारा उतारे, फेरफार उतारा व आठ–अ उतारा व त्यावरील नोंदी हया पुरावा देउन खोडुन काढल्या जात नाही तो पर्यंत त्या नोंदी व त्यातील मजकूर हा महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातील तरतुदी नुसार खरा व बरोबर असल्याचे ग्राह्य धरणे योग्य होणारे आहे. त्यामुळे वादींनी दाखल केलेले वाद शेत मिळकतीचा फेरफार उतारा, आठ–अ व सातबारा उतारा आणि पेरेपत्रक यावरुन वादी हे दावा मिळकतीचे कब्जेदार असल्याचे शाबीत होते. याउलट प्रतिवादींनी/प्रतिदाव्यातील वादींनी वाद मिळतीवर त्यांचा कब्जा असल्याचे दाखविणारा ठोस पुरावा दाखल केलेला नाही.

२४. त्यामुळे अभिलेखावरील एकंदरीत कागदोपत्री पुराव्या वरुन सध्यास्थीतीला मुळ दाव्यातील वादी हेच वाद शेत मिळकतीचे कब्जेदार असल्याचे सकृत दर्शनी शाबीत होते. परिनामी मुळ दाव्यातील वादींनी प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली आहे. तसेच प्रतिदाव्यातील वादींनी प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली नाही. न्यायाचा/सोईचा समतोल हा नेहमी प्रथमदर्शनी केसच्या बाजूने असतो. मूळ दाव्यातील वादींनी प्रथम दर्शनी केस शाबीत केली असल्यामुळे दाव्याचा/न्यायाचा समतोल हा वादींच्या बाजूने आहे. तसेच नि.क्र.५ वरील तूर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर केल्यास प्रतिदाव्यातील वादी हे मुळ वादींना वाद शेतामधुन बेदखल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्यांना विवाद्य मिळकतीच्या कब्जे उपभोगास हरकत अडथळा करतील त्यातूळे वादींचे अपरिमित असे नुकसान होणारे आहे. याउलट तूर्तातूर्त मनाई अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे /प्रतिदाव्यातील वादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ याचे निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र.४ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी देतो.

**<u>मुद्दा क्र. ७ करीता</u>**

२५ वर नमुद मुद्दा क्र.१ ते ६ करीता मी दिलेली कारणमिमांसा यावरून वादींचा नि.क्र.५ वरील तूर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर करणे व वादींच्या हक्कात प्रतिवादी विरूध्द तूर्तातूर्त मनाई आदेश पारित करणे योग्य होणारे आहे व प्रतिवादींचा नि.क्र.२४ वरील तूर्तातूर्त मनाई अर्ज नामुंजर करणे योग्य होणारे आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ७ च्या उत्तरादाखल पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## :: आदेश ::

१. वादींचा तूर्तातूर्त मनाई अर्ज नि.क्र.५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिदाव्यातील आवेदक/वादी यांचा नि.क्र.२४ वरील तूर्तातूर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी मुळ दाव्याचा निकाल लागे पावेतो वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस स्वत: अथवा ईतरा मार्फत कोणत्याही प्रकारचा हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई आदेश देण्यात येतो.

४. खर्चाची रक्कम मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात यावी.

(एस. एम. कोळेकर)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
महागांव, जि. यवतमाळ.

दिनांक : २४/०८/२०२२